# Sant Gadge Baba Amravati University, Amravati

**Report of Principal's Meeting/Workshop conducted on behalf of Internal Quality Assurance Cell**

**Brainstorming and interaction meeting/workshop with Institutional management representatives**

"One Day Principal's meeting/workshop" conducted by the Internal Quality Assurance Cell of Sant Gadge Baba Amravati University in association with Joint Director Office of Higher Education Department, Amravati. The workshop was held at Dr. K.G. Deshmukh Hall on September 26, 2023. The following dignitaries were present at the workshop:

Pro Vice-Chancellor of the University, Dr. Prasad Wadegaonkar

Joint Director of Higher Education, Amravati Division, Nalini Tembhekar

Administrative Officer, Shri Ram Rathod

University I.Q.A.C. Director, Dr. Sandeep Waghuley

During the workshop, Dr. Nalini Tembhekar emphasized that the new National Education Policy will be implemented in every college from next year. She also mentioned that it is important for every college to take a knock and that the government has policies for the colleges which have been NAAC accredited. She further added that the list of colleges which have not yet undergone NACC assessment should also be informed to the government.

Pro-Vice Chancellor Dr. Prasad Wadegaonkar guided the Principal and said that every college must face the NAAC so that the students get physical facilities along with education, to increase their educational standard. The New National Education Policy has emphasized on educational reforms and the government has made NAAC assessment mandatory. On this occasion, he also appealed to the colleges which have not yet conducted the NACC assessment to conduct the NACC assessment as soon as possible.

Dr. Gajanan Sharma, Principal of Matoshree Sayerbai Champalalji Chopda B.Ed. College, Khamgaon, Buldhana, and a representative from Hanuman Vyayam Shala Krida College of Physical Education, Yavatmal, along with representatives from Lokhit B.P.Ed. College, Dr. Yavatmal, Late Panchfulabai Pavde Arts, Commerce Women's College, Warud, Yuvashakti Arts and Science College, Amravati, Thakur Arts, Commerce and Science Night College, Yavatmal, Arts College, Gadgona, Nandgaon, and Rajmata Jijau Women's College, Ner, Distt. Yavatmal, including Dr. Sudhakar Tanware, asked questions. Pro-Vice-Chancellor Dr. Prasad Wadegaonkar, Joint Director Dr. Nalini Tembhekar, Administrative Officer Shri Ram Rathod, and I.Q.A.C. Director Dr. Sandeep Waghuley suggested that they should be given a NAAC assessment by giving relevant answers. The meeting/workshop was attended by the presidents, principals, teachers, and their representatives of affiliated colleges.

**Sd/-**
(Dr. Sandeep Waghuley)
Director, I.Q.A.C.
Sant Gadge Baba Amravati University

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष च्या वतीचे आयोजित प्राचार्यांच्या सभेचा/कार्यशाळेचा अहवाल
## संस्थात्मक व्यवस्थापन प्रतिनिधींसोबत विचारमंथन आणि संवाद बैठक

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक कार्यालय, अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने एकदिवसीय प्राचार्यांची सभा दि. २६ सप्टेंबर, २०२३ रोजी विद्यापीठातील डॉ.के.जी. देशमुख सभागृह येथे संपन्न झाली. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगांवकर, प्रमुख अतिथी म्हणून अमरावती विभागाच्या उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. नलिनी टेंभेकर, प्रशासन अधिकारी श्री राम राठोड व विद्यापीठ आय.क्यु.ए.सी. संचालक डॉ. संदीप वाघुळे उपस्थित होते.

सभेमध्ये शासनाची भूमिका मांडतांना सहसंचालक डॉ. नलिनी टेंभेकर म्हणाल्या, पुढच्या वर्षीपासून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रत्येक महाविद्यालयांमध्ये राबवावयाचे आहे. त्याकरीता प्रत्येक महाविद्यालयाने नॅक करुन घेणे अत्यंत महत्वाचे आहे. नॅक मूल्यांकन झालेल्या महाविद्यालयांकरीताच शासनाची धोरणे असून ज्या महाविद्यालयांनी अद्यापपर्यंत नॅक मूल्यांकन केले नाही, त्या महाविद्यालयांची यादी सुद्धा शासनाला कळविण्यात यावी, असे शासनाने निर्देश दिले असल्याचे त्यांनी याप्रसंगी सांगितले.

प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगांवकर प्राचार्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले, विद्यार्थ्यांना शिक्षणासह भौतिक सुविधा मिळाव्यात, त्यांचा शैक्षणिक दर्जा वाढावा, याकरीता प्रत्येक महाविद्यालयांनी नॅकला सामोरे जाणे आवश्यक आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये शैक्षणिक सुधारणेवर भर देण्यात आला असून शासनाने नॅक मूल्यांकन करणे बंधनकारक केले आहे. ज्या महाविद्यालयांनी अद्यापपर्यंत नॅक मूल्यांकन केले नाही, त्यांनी लवकरात लवकर नॅक मूल्यांकन करावे, असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले.

सभेमध्ये नॅकविषयी मातोश्री सायरबाई चंपालालजी चोपडा बी.एड. महाविद्यालय, खामगांव, बुलढाणाचे प्राचार्य डॉ. गजानन शर्मा, हनुमान व्यायाम शाळा क्रीडा मंडळाचे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, यवतमाळचे प्रतिनिधी, लोकहीत बी.पी.एड. महाविद्यालय, यवतमाळचे डॉ. अमोल देशमुख, स्व. पंचफुलाबाई पावडे कला, वाणिज्य महिला महाविद्यालय, वरुडचे प्रतिनिधी, युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचे प्राचार्य डॉ. अजय गुल्हाने, ठाकूर कला, वाणिज्य व विज्ञान रात्रकालीन महाविद्यालय, यवतमाळचे प्रतिनिधी, कला महाविद्यालय, वाढोणा, नांदगावचे डॉ. राहूल तट्टे, राजमाता जिजाऊ महिला महाविद्यालय, नेर, जि. यवतमाळचे डॉ. सुधाकर तनवारे आदींनी विचारलेल्या प्रश्नांची प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगांवकर, सहसंचालक डॉ. नलिनी टेंभेकर, प्रशासन अधिकारी श्री राम राठोड व आय.क्यु.ए.सी. संचालक डॉ. संदीप वाघुळे यांनी समर्पक उत्तरे देवून त्यांना नॅक मूल्यांकन करावे, असे सांगितले. सभेला संलग्नित महाविद्यालयांचे संस्थाध्यक्ष, प्राचार्य, शिक्षक तसेच त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

स्वा/-
( डॉ. संदीप वाघुळे )
संचालक, आय.क्यु.ए.सी.
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

